# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

राष्ट्रीय महामार्ग कं. ६, जिल्हा उद्योग केद्रा समोर, जळगांव -४२५ ००२

फोन नं.०२५७-२२८१५२२. फॅक्स न.०२५७-२२८१३१९.

---

जा.क्र.शाअमज/संगणक दुरुस्ती /२०१८-१९/ 2420. दि. 11 SEP 2018

परिपत्रक :-

विषय :- विभागातील बंद पडलेल्या संगणकांची विभागांनी तातडीने दुरुस्ती करणे बाबत.

संदर्भ :-१) परिपत्रक क्र. शाअमज/संगणक दुरुस्ती /२०१८-१९/११२२. दि.१९/०४/२०१८.
२) मे.अमेया कॉम्पुटर, जळगाव यांना जारी करण्यात आलेले कार्यआदेश क्र. शाअमज/संगणक दुरुस्ती-१/ २०१८-१९/२०९१ दि.०४/०८/२०१८
३) प्रशिक्षण व आस्थापना विभाग यांचे पत्र क्र. --- दि.२८/०८/२०१८.

उपरोक्त विषयान्वये व संदर्भान्वये महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख व प्रभारी प्रयोगशाळा अधिकारी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, एका पाहणीतुन असे निदर्शनास आले होते की, महाविद्यालयातील बऱ्याच विभागात किरकोळ दुरुस्ती अभावी मोठ्या प्रमाणात संगणक विनावापर पडुन असल्यामुळे, त्यांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी वापर होत नसल्यामुळे, या करिता महाविद्यालयाने संगणक दुरुस्ती संदर्भात एक धोरण तयार केलेले आहे.(सदर धोरणाच्या व त्या संदर्भातील परिपत्रकाच्या , तुलनात्मक तक्त्याच्या व कार्यआदेशाच्या छायांकित प्रति यापुर्वीच सर्व विभागांना भांडारामार्फत वितरीत करण्यात आलेल्या आहेत ) **सदर धोरणाची अंमलबजावणी करुन महाविद्यालयातील सर्व विभागांनी संगणकांची दुरुस्ती करणे कामी मे.अमेया कॉम्पुटर, छात्रशक्ती, १७१, नवी पेठ, नटवर टॉकीज समोर, जळगाव मोबाईल नं.९८२२९१७६०८/ ९४२२२७८१०२** यांच्याशी संपर्क साधुन विभागातील संगणकांची तपासणी करुन घ्यावी व सदरच्या तपासणीच्या कामाचा मोबदला म्हणुन प्रति संगणक रु. १००/- प्रमाणे आणि विभागांनी उपलब्ध करुन दिलेल्या तुलनात्मक तक्त्यातील कमीत-कमी दर असणाऱ्या पुरवठादाराकडुन प्राप्त होणाऱ्या सुट्याभागापासुन संगणक दुरुंस्त केल्या बद्दल मे. **अमेया कॉम्पुटर, छात्रशक्ती, १७१, नवी पेठ, नटवर टॉकीज समोर, जळगाव** यांना एका संगणकाच्या दुरुस्तीच्या बदल्यात रु. २००/- प्रति संगणक प्रमाणे मोबदला देय असेल व तसे ते एकत्रीत देयक सादर करु शकतील.

प्रथम सर्व विभागांनी बंद पडलेल्या संगणकाचे तपासणीचे काम पुर्ण करुन घ्यावे तद्नंतर गरजे प्रमाणे आवश्यक असणारे सुट्टे भाग कमीत-कमी दर असणाऱ्या तुलनात्मक तक्त्यातील पुरवठादारा कडुन च गरजेप्रमाणे पुरवठा आदेश देऊन साहित्य खरेदी करावे.

**(१) मे.कॉम्पुटर बिम, २२५ पहिला मजला, गोलाणी मार्केट, जळगाव**

**(२) मे. स्पार्क कॉम्पुटर , १८, हारेश्वर नगर, रिंग रोड, जळगाव**

**(३)मे.अमेया कॉम्पुटर, छात्रशक्ती, १७१, नवी पेठ, नटवर टॉकीज समोर, जळगाव** यांच्याकडुनच उपलब्ध करुन घ्यावेत व मे. अमेया कॉम्पुटर, जळगाव यांना दुरुस्तीचे काम पुर्ण करुन घेण्यासाठी त्यांच्या ताब्यात देण्यात यावेत.संगणक दुरुस्तीचे काम पुर्ण झाल्यावर प्राप्त होणारी मजुरीची व सुट्ट्या भागांची देयके विभागांनी पारित करुन लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावीत.

विभागात दुरुस्त झालेले सदरचे संगणक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी तसेच भविष्यात होणाऱ्या विविध ऑनलाईन परीक्षा करिता त्यांचा वापर करणे सुलभ होईल. यास्तव सर्व विभागांनी उचीत कार्यवाही करुन विभागातील संगणक तात्काळ दुरुस्त करुन घ्यावेत.

**तसेच जे संगणक कालबाह्य झालेले आहेत आणि दुरुस्त करणे महाविद्यालयाच्या हिताचे नाही त्यांचे निर्लेखन प्रस्ताव तातडीने तयार करुन निर्लेखन समितीकडे आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व विभागांनी सादर करावेत.**

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

प्रत -सर्व विभाग प्रमुख अणुविद्युत / विद्युत / उपकरणीकरण / यंत्र / संगणक / स्थापत्य /उप.विज्ञान /कर्मशाळा / ग्रथालय /कार्यालय / संशोधन विभाग (पदव्युत्तर पदवी)/ वसतीगृहे / डीन ऑफीस /जिमखाना /प्रशिक्षण व आस्थापना / विश्राम गृह / सी एन डब्लयु / Acadamic यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीस्तव.